# ववा ग्रामस्थांनी केली 'जलक्रांती'

पावसाळा संपत आलाय म्हणावा तसा पाऊस बरसलाच नाही. औरंगाबाद जिल्हयातील जलसाठयांमध्ये पुरेशी वाढ झालेली नाही. भूजल पातळीही कमीच आहे. अशा अंचाईच्या काळातच पाण्याच्या नियोजनाच महत्व खऱ्या अर्थानं जाणवायला लागतं. उपलब्ध पर्जन्यमानाचं सूयोग्य नियोजन करून दुष्काळावर, पाणीटंचाईवर मात करून जलक्रांती कशी घडवून आणता येते याचा वस्तुपाठ टंचाईग्रस्त पैठण तालुक्यातील ववा या गावाने घालून दिला आहे. ग्रामस्थांच्या भगिरथ प्रयत्नातून निर्माण झालेली ही ववा गावची यशोगाथा अन्य दुष्काळग्रस्तांसाठी निश्चितच अनुकरणीय ठरणार आहे.

ग्रामविकास संस्थेमार्फत लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या "आपला विकास आपल्या हाती" हया अभिनव ग्रामसुधारणेच्या प्रकल्पाची नोंद घेवून महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद जिल्हयातुन 'ववा' गावाची आदर्श गाव प्रकल्पासाठी निवड करून. सततचा दुष्काळ रोजगाराचा अभाव, विकासापासून वंचीत ववा ग्रामस्थांना आदर्श गाव प्रकल्पामुळे दुष्काळ मुक्तीसाठी चालून आलेली संधीच होती. दुष्काळावर कायमची मात करण्यासाठी ववा ग्रामस्थांनी आदर्श गाव प्रकल्पाअंतर्गत तीनशे हेक्टरवर कंपार्टमेंट बंडीग, दहा माती व दगडीप्लग, एक माती बांध आणि तीन सिमेंट बंधारे करण्यात आली आहेत.याचबरोबर कृषी व इतर विभागाच्या मदतीने गायरान जमीनीवर डीप सि.सि.टी. व तीन सिमेंट बंधारे पुर्ण करण्यात आली आहेत. लोकसहभागातुन पाझर तलावातील ५००० ट्रीप गाळ काढण्यात आला. पहिल्या टप्यातील या कामाचा एकून परिणाम असा झाला आहे की, ज्या भागात पाणलोटाची कामे झालेली आहेत त्या भागातील विहीरीच्या पाण्याची भूजलपातळी वाढुन सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. याच्या विरूध्द दिशेच्या शिवारातील शेतकऱ्यांना कापसावर फवारणी करण्यासाठी घरून पाणी घेवून जावे लागत आहे. भूजलपातळी वाढलेल्या भागातील बहुतांश शेतकऱ्यांनी प्रवाही पध्दतीला फाटा देवून ठिबकनेच पाणी दिल्यामुळे ठिबकचा शिरस्ताच गावात पडत आहे. यावर्षी पाणलोटाची कामे झालेल्या भागात किमान एक्करी पाच ते सात क्विंटलने कापुस उत्पादनात वाढ होणार आहे. याचबरोबर रब्बी पिकास व उन्हाळयात भाजीपाला व फळबागासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

पाणी हा विषय घेऊन ग्रामविकास संस्था प्राधान्याने काम करते आहेच परंतु त्याचबरोबर ववा गावास सर्वांगिन विकासाचा आदर्श मॉडेल म्हणून प्रस्तुत करण्याचा संस्थेचा प्रयास आहे. "आपला विकास आपल्या हाती" या भूमिकेला अनुसरून जन सहभागातून विकास ही संकल्पना राबविण्यात आली आहे. त्यादृष्टीने गावात विविध ग्रामसमित्यांची स्थापना करण्यात येऊन ग्रामस्थांच्या सहकार्याने विविध प्रकल्प राबविण्यात आले आहे. ग्रामस्थांचे क्षमताबांधणी प्रशिक्षण, आदर्श गाव हिवरेबाजार येथे सहल, घर तेथे शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनासाठी घर तेथे शोषखड्डे, परिसरात वृक्षारोपण, एक गाव एक रंग, ग्रामस्वच्छता, आरोग्य शिबिरे आदी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्याद्वारे ववा गावचा कायापालट घडवून आणण्यात फार मोठे यश लाभले आहे. आदर्श गाव प्रकल्पाअंतर्गत सामाजिक

बहुउद्देशीय सभागृह व प्रथम टप्प्यातील पाणलोटाची कामेही पूर्ण झालेली आहेत. आता शिवाराच्या उर्वरित भागातील पाणलोटाची कामे येत्या वर्षभरातील नियोजनात पूर्ण करण्याचा ग्रामस्थांचा व संस्थेचा मानस आहे.

वर्षानुवर्ष दुष्काळाचा शाप भाळी मिरवणाऱ्या ववा गाव व परिसरात नंदनवन फुलविण्याचा, परिसराला कायमंच दुष्काळमुक्त करण्याचा वसा गावातील ग्रामस्थांनी उचलला आहे. कामाची मधुर फळे आताच कुठे चाखायला मिळत आहेत.

औरंगाबाद व परिसरातील दुष्काळग्रस्त गावांपुढे ववा हे गाव एक आदर्श या स्वरूपात पुढे यावे व त्यापासुन प्रेरणा घेवून गावेची गावे दुष्काळाच्या दुष्टचक्रातून कायमची बाहेर पडावी असा वस्तुपाठ घालून देण्याचा ग्रामस्थ व ग्रामविकास संस्थेचा दृढ संकल्प आहे.

**ववा ग्रामसभेचे निर्णय**

१. विंधन विहीर न घेण्याचा निर्णय.
२. घर तेथे शौचालय.
३. एक गाव एक रंग.
४. घर तेथे शोषखड्डा.
५. व्यसनमुक्त गाव.
६. सप्तसुत्रीचे पालन.
७. महिन्यातून एकदा सामुहिक श्रमदान.

**विशेष.**

१. युवकांचा व महिलांचा सक्रिय सहभाग.
२. आठ महिला बचत गट कार्यरत.
३. किशोरींसाठी जिवन कौशल्य प्रशिक्षण.
४. महिलांची आरोग्य तपासणी.
५. सामुहिक पशुधन लसीकरण.

## पुढील नियोजन

१. पाण्याचा ताळेबंद.
२. ठिबकचा वापर.
३. पीक पध्दतीत बदल.
४. युवकांना शेतीपुरक उद्योग.
५. संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय.
६. कुपोषणमुक्त गाव.
७. महिलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य.
८. भूमीहिनांना गावात रोजगार उपलब्ध.
९. पायाभुत सुविधा उभारण्यावर भर.
१०. सामुहिक वृक्षारोपण.
११. गटशेतीचा अवलंब.



नरहरी शिवपुरे
सचिव
ग्रामविकास संस्था
मो.९८२२४३१७७८